RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

**वर्ष १२, अंक ४८] सोमवार, जुलै १३, २०२६/आषाढ २२, शके १९४८ [पृष्ठे ९, किंमत : रुपये ४.००**

**असाधारण क्रमांक ११४**

**प्राधिकृत प्रकाशन**

### वित्त विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जुलै, २०२६.

### अधिसूचना

क्रमांक एलएनएफ - २०२६/प्र.क्र.५४/अर्थोपाय

**राज्य शासनाच्या कर्जरोख्यांची विक्री व निर्गमन**

याद्वारे, महाराष्ट्र शासन, **अधिसूचना क्रमांक एलएनएफ-१०.१९/प्र.क्र.१०/अर्थोपाय, दिनांक १६ मे, २०१९** अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासनाने काढलेल्या शासकीय कर्जरोख्यांच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश, “रोखे” असा केला आहे) विक्री व निर्गमन करण्याच्या अटी व शर्ती अधिसूचित करीत आहे.

**२. नाव व प्रयोज्यता –**

(एक) या अधिसूचनेस, महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्जरोख्यांची विक्री व निर्गमन करण्यासाठी सर्वसाधारण अधिसूचना (यात यापुढे जिचा निर्देश, ‘सर्वसाधारण अधिसूचना’ असा केला आहे) असे म्हणावे.

(दोन) या अधिसूचनेत अंतर्भूत असलेल्या सर्वसाधारण अटी व शर्तीना आणि कोणत्याही “विनिर्दिष्ट कर्जरोख्यांची निर्मिती व निर्गमन करण्याबाबत काढण्यात आलेल्या इतर कोणत्याही अधिसूचनेला (यात यापुढे जिचा निर्देश, “विनिर्दिष्ट अधिसूचना” असा केला आहे) अधीन राहून, विक्री व निर्गमन कर्जरोखे असेल.

**३. उद्दिष्ट –**

या अधिसूचनेचे उद्दिष्ट कर्जरोखे काढण्यासाठी लागू असलेल्या अटी व शर्ती आणि वेगवेगळ्या प्रकारच्या कर्जरोख्यांच्या निर्गमन करण्याच्या विवक्षित वैशिष्ट्ये व कार्यपद्धतींची यादी करणे आहे. भारत सरकारच्या संविधानाच्या अनुच्छेद २९३(१) नुसार, महाराष्ट्र राज्याच्या एकत्रित निधीच्या प्रतिभूतीवर कर्जरोखे निर्गमित केले जातील.

**४. कर्जरोख्यांचे प्रकार –**

महाराष्ट्र शासन, वेळोवेळी पुढील प्रकारचे कर्जरोखे निर्गमित करील :

**एक. नियत कुपनदर कर्जरोखे –**

(क) या कर्जरोख्यांवर दर्शनी मूल्यावर लागू होणारा विशिष्ट कुपनदर असेल जो, लिलाव प्रक्रियेद्वारे किंवा अन्यथा, संबंधित विनिर्दिष्ट अधिसूचनेत विनिर्दिष्ट केल्यानुसार निर्धारित केला जातो आणि हा दर कर्जरोख्यांच्या संपूर्ण मुदतीत स्थिर राहील.

(ख) हे कर्जरोखे सवलतीच्या दराने, दर्शनी मूल्यावर, सममूल्यावर किंवा अधिमूल्यावर निर्गमित केले जाऊ शकतात.

(ग) हे कर्जरोखे एक वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या मूळ मुदतसमाप्ती करिता निर्गमित केले जाऊ शकतात.

(घ) या कर्जरोख्यांची परतफेड दर्शनी मूल्यावर किंवा विनिर्दिष्ट अधिसूचनेत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे केली जाईल.

**दोन. संबंधित विनिर्दिष्ट अधिसूचनेत अधिसूचित नमूद केल्याप्रमाणे इतर वैशिष्ट्यांसह असलेले कर्जरोखेही जारी केले जाऊ शकतील.**

**५. सर्वसाधारण अटी व शर्ती –**

सर्व कर्जरोख्यांची विक्री व निर्गमन करण्यासाठी लागू असलेल्या सर्वसाधारण अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील:

**एक. पात्र गुंतवणूकदार :-**

(क) भारतात राहणारी कोणतीही व्यक्ती, ज्यात, भागिदारी संस्था, कंपन्या, निगम निकाय, संस्था, इतर राज्य शासने, कायदेमंडळ असलेले संघ राज्यक्षेत्रे, भविष्य निर्वाह निधी, निवृत्तिवेतन निधी, विश्वस्त संस्था, अविभक्त हिंदू कुटुंब तसेच वैयक्तिक गुंतवणूकदार व्यक्ती यांचा समावेश होईल, परंतु, एवढ्यापुरतेच मर्यादित असणार नाही.

(ख) परकीय चलन व्यवस्थापन कायदा, १९९९ अन्वये लागू काढलेल्या परकीय चलन व्यवस्थापन (कर्ज संलेख) विनियम, २०१९ नुसार भारताबाहेर राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला कर्जरोख्यांमध्ये गुंतवणूक करण्याची परवानगी असेल.

**दोन. कर्जरोख्यांची विक्री व निर्गमन करण्याची प्रक्रिया/कार्यपध्दती :-**

कर्जरोख्यांची विक्री व निर्गमन करण्यासाठीची कार्यचालन कार्यपद्धती आणि इतर तपशील, जसे की, निर्गमन करण्याचा दिनांक व ठिकाण, मुदत, निर्गमन करण्याची पद्धत, इत्यादी बाबी भारतीय रिझर्व्ह बँकेकडून (दि रिझर्व्ह बँक) प्रसिद्धी पत्रकाव्दारे किंवा आवश्यकतेनुसार इतर कोणत्याही माध्यमांद्वारे जाहीर केले जातील.

**तीन. स्वरूप :-**

रोखे गुंतवणूकदारांना त्यांचे कर्जरोखे भारतीय रिझर्व्ह बँकेकडून ठेवण्यात आलेल्या त्यांच्या दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेख्यात१ (Subsidiary General Ledger - एसजीएल) किंवा घटक दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेख्यात२ (Constituents Subsidiary General Ledger - सीएसजीएल) यामध्ये जमा करून किंवा शासकीय कर्जरोखे अधिनियम, २००६ मधील तरतुदींनुसार परवानगी असेल अशा इतर कोणत्याही स्वरूपात जारी करण्यात येतील.

१. दुय्यम सर्वसाधारण खातेवही (एसजीएल) याचा अर्थ, सरकारी कर्जरोखे धारण करण्यासाठी किंवा /आणि त्यामध्ये व्यवहार करण्यासाठी रिझर्व बँकेत उघडलेले आणि चालवलेले खाते, असा आहे.

२. सीएसजीएल हे अभिकर्त्याने त्याच्या घटकाच्या नावाने रिझर्व बँकेत उघडलेले आणि चालवलेले एसजीएल खाते आहे.

**चार. किमान अभिदान :-**

कर्जरोखे किमान रु.१०,००० (दर्शनी मूल्य इतक्या रक्कमेचे) आणि त्यानंतर रु.१०,०००/- च्या पटीत जारी करण्यात येतील तथापि राज्य शासनाशी सल्लामसलत करुन, भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) विनिर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही रकमेसाठी कर्जरोख्याची रक्कम निश्चित करु शकेल.

**पाच. प्रदान :-**

यशस्वी एसजीएल/सीएसजीएल (SGL/CSGL) खातेधारकांनी, विनिर्दिष्ट अधिसूचनेत नमूद करण्यात येईल किंवा भारतीय रिझर्व्ह बँकेकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकाना, भारतीय रिझर्व्ह बँकेकडे असलेल्या त्यांच्या चालू खात्यातून खर्च करण्याच्या प्राधिकाऱ्याच्या माध्यमातून किंवा इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरणाद्वारे अथवा भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्धारित केलेल्या इतर कोणत्याही माध्यमातून कर्जरोख्यांचे प्रदान अदा करेल.

**सहा. कुपन :-**

(क) रिझर्व्ह बँकेच्या लोक ऋण कार्यालयांद्वारे, (पीडीओ) (Public Debt Offices) कर्जरोख्यावरील कूपन (व्याज) प्रदान केले जाईल. याबाबत रिझर्व्ह बँकेने, विनिर्दिष्ट केल्यानुसार, रिझर्व्ह बँकेच्या / अभिकरणाच्या कोणत्याही कार्यालयाच्या बंधपत्र खातेवही लेख्यामध्ये (Bond Ledger Account) धारण केलेल्या कर्जरोख्यावरील कूपन रक्कम यासंदर्भात भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्दिष्ट केलेल्या संबंधित कार्यालयात/अभिकरणामार्फत प्रदान करण्यात येईल.

(ख) कूपन रक्कमेचे देयक जवळच्या पूर्ण रुपयात पूर्णांकित करून दिले जाईल. या प्रयोजनासाठी पन्नास पैशांपेक्षा कमी असलेली कूपनची रक्कम दुर्लक्षित करण्यात येईल आणि पन्नास पैसे किंवा अन्यथा विनिर्दिष्ट केले नसेल तर, त्यापेक्षा अधिक रकमेचे पुढील पूर्ण रुपयात पूर्णांकित करण्यात येईल.

**सात. परतफेड :-**

(क) कर्जरोख्यांची परतफेड भारतीय रिझर्व्ह बँकेच्या लोक ऋण कार्यालयात (PDO) किंवा परतफेडीच्या वेळी ज्या इतर संस्थेत त्यांची नोंदणी असेल त्या संस्थेमार्फत करण्यात येईल.

(ख) विनिर्दिष्ट अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या विमोचन दिनांकास किंवा यथास्थिति, विनिर्दिष्ट विमोचन दिनांकापूर्वी राज्य शासनाला / कर्जरोखे धारकाला अंतःस्थापित विकल्पाचा वापर करून कर्जरोख्यांची परतफेड करता येईल.

(ग) राज्य शासन पुनर्खरेदी लिलावाद्वारे (Buyback Auction) कर्जरोख्यांची किंमत निर्धारित करून, त्यांच्या विनिर्दिष्ट विमोचन दिनांकापूर्वी, भारतीय रिझर्व्ह बँकेने राज्य शासनाशी विचारविनिमय करून निर्धारित केलेल्या कोणत्याही दिनांकाला कर्जरोख्यांची पुनर्खरेदी (buyback) करता येईल.

**आठ. हस्तांतरणीयता :-**

(क) शासकीय कर्जरोखे अधिनियम, २००६ आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेले शासकीय कर्जरोखे विनियम, २००७ यांच्या तरतुदींनुसार, आणि या अधिसूचनेच्या आणि यासंबंधात काढण्यात येतील, अशा कोणत्याही अधिसूचनेच्या शर्तींनुसार, त्या कर्जरोख्यांचे नूतनीकरण, पोट-विभाजन, एकत्रीकरण, रूपांतरण किंवा हस्तांतरण करता येईल.

(ख) एका प्रकारच्या कर्जरोख्यांचे अन्य प्रकारच्या कर्जरोख्यांच्या प्रकारात रूपांतरण हे विनिर्दिष्ट अधिसूचनेतील शर्तीच्या अधीन असेल.

(ग) भारताबाहेर राहणाऱ्या व्यक्तींकडून कर्जरोख्यांचे हस्तांतरण हे परदेशी चलन व्यवस्थापन अधिनियम, १९९९ अन्वये तयार केलेल्या विनियमांनुसार तसेच त्याअंतर्गत देण्यात आलेल्या निर्देशांच्या अधीन असेल.

**नऊ. लागू असलेले कायदे :-**

(क) कर्जरोख्यांसाठी स्वाक्षरी करणाऱ्या किंवा कर्जरोखे धारण करणाऱ्या सर्व व्यक्तींचे हक्क हे शासकीय कर्जरोखे अधिनियम, २००६ आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेले शासकीय कर्जरोखे विनियम, २००७ च्या तरतुदींनुसार, तसेच या अधिसूचनेच्या आणि यासंबंधात यापुढे वेळोवेळी महाराष्ट्र शासनाद्वारे काढण्यात येतील, अशा कोणत्याही अधिसूचनेच्या शर्तींनुसार निश्चित करण्यात येतील.

(ख) कर्जरोख्याच्या गुंतवणूकदाराचे किंवा धारकाचे कर दायित्व आकारणी करण्याच्या व निर्धारित करण्याच्या प्रयोजनार्थ, भारतात त्या त्यावेळी अंमलात असलेल्या करविषयक कायद्यांच्या तरतुदी लागू होतील.

(ग) कर्जरोख्या संबंधातील कोणतेही विवाद भारतातील सक्षम न्यायालयांच्या अधिकारितेच्या अधीन असेल.

**६. कर्जरोखे काढण्याच्या पद्धती :-**

महाराष्ट्र शासन, पुढील पद्धतीने कर्जरोखे जारी करु शकेल :

**एक. लिलावाद्वारे कर्जरोखे काढणे :-**

(क) कर्जरोखे एकतर प्राप्तीच्या आधारावर किंवा किंमतीच्या आधारावर लिलावाद्वारे काढण्यात येतील. जेव्हा नियतकालीक कूपन देय असलेले कर्जरोखे प्राप्तीच्या आधारावर काढण्यात येतील, तेव्हा कूपन हा, यात यानंतर तरतूद केलेल्या रीतीने आणि विनिर्दिष्ट अधिसूचनेत निर्देशिल्याप्रमाणे भारतीय रिझर्व्ह बँकेकडून आयोजित करण्यात आलेल्या लिलावातून ठरविण्यात येईल. जेव्हा नियतकालीक कूपन देय असलेले कर्जरोखे किंमतीच्या आधारावर काढण्यात येतील तेव्हा कूपन पूर्व-निर्धारित असेल.

(ख) लिलावासाठी स्पर्धात्मक व अ-स्पर्धात्मक या दोन्ही प्रकारच्या लिलावातील बोली, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या 'कोअर बँकिंग सोल्यूशन' वर किंवा भारतीय रिझर्व्ह बँकेने निश्चित केलेल्या इतर कोणत्याही प्लॅटफॉर्म / प्रणालीवर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सादर करण्यात येतील. भारतीय रिझर्व्ह बँक अपवादात्मक परिस्थितीत प्रत्यक्ष स्वरूपातील बोली सादर करण्यास परवानगी देईल.

(ग) स्पर्धात्मक बोलीदार प्राप्तीच्या किंवा यथास्थिति, किंमतीच्या समान/वेगवेगळ्या उत्पन्न दरांवर, एकापेक्षा अधिक बोली सादर करू शकेल. लिलावामध्ये एका अर्जदाराने सादर केलेल्या सर्व बोलींच्या एकूण रकमेपेक्षा कर्जरोखे लिलावासाठी निर्धारित अधिसूचित रक्कम अधिक असणार नाही.

(घ) भारतीय रिझर्व्ह बँक, 'लिलावात कर्जरोख्यांच्या खरेदीसाठीची जी बोली स्वीकारली असेल त्या' बोलींच्या आधारे, प्राप्तीचा कमाल उत्पन्न दर किंवा यथास्थिति, किमान किंमत निर्धारित करील व त्या कर्जरोख्याच्या खरेदीसाठीच्या लिलावातील बोली स्वीकारण्यात येतील. नियतकालीक कूपन देय असलेल्या कर्जरोख्यांचा, लिलावात निर्धारित केलेला प्राप्ती-आधारित कमाल प्राप्तीदर हा कर्जरोख्यांच्या उत्पन्नाचा वार्षिक कूपन दर राहील.

(ङ) किरकोळ गुंतवणूकदारांना, भारतीय रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेल्या अस्पर्धात्मक बोली सुविधेच्या विद्यमान योजनेनुसार 'अ-स्पर्धात्मक' तत्त्वावर लिलावात सहभागी होता येईल.

(च) भारतीय रिझर्व्ह बँकेला, राज्य शासनाशी विचारविनिमय करून, विनिर्दिष्ट अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेपर्यंत अतिरिक्त अभिदान धारण करता येईल.

(छ) कर्जरोखे काढण्याचा लिलाव (प्राप्ती-आधारित किंवा किंमत-आधारित) 'एकसमान किंमत' पद्धतीनुसार किंवा 'बहुविविध किंमत' पद्धतीनुसार किंवा भारतीय रिझर्व्ह बँकेने राज्य शासनाशी वेळोवेळी विचारविनिमय करून ठरवलेल्या इतर कोणत्याही पद्धतीनुसार आयोजित करण्यात येईल.

(i) जेव्हा 'एकसमान किंमत' पद्धतीने लिलाव करण्यात येईल तेव्हा भारतीय रिझर्व्ह बँकेकडून निर्धारित केल्याप्रमाणे प्राप्तीच्या कमाल दरापर्यंतच्या किंवा त्याचा समावेश असणाऱ्या दराने किंवा बोलीच्या किमान किंमती पर्यंतच्या किंवा तिचा समावेश असणाऱ्या किंमतीने स्पर्धात्मक बोली, प्राप्तीच्या कमाल दराने किंवा बोलीच्या किमान किंमतीने बोली स्वीकारण्यात येईल. अशाप्रकारे निर्धारित केलेल्या प्राप्तीच्या कमाल दरापेक्षा अधिक दर किंवा किमान किंमतीपेक्षा कमी किंमत उद्धृत करणाऱ्या बोली फेटाळण्यात येतील.

(ii) जेव्हा 'बहुविविध किंमत' पद्धतीने लिलाव करण्यात येईल तेव्हा, रिझर्व्ह बँकेकडून निर्धारित केल्याप्रमाणे, प्राप्तीच्या कमाल दरापर्यंत किंवा बोलीच्या किमान किंमतीने केलेल्या स्पर्धात्मक बोली, संबंधित बोली दराने स्वीकारण्यात येईल. प्राप्तीवर आधारित लिलावात, ज्या यशस्वी बोलीदारांनी, स्वीकारलेल्या प्राप्तीच्या कमाल दरापेक्षा कमी दर उद्धृत केले आहेत, त्यांनी तफावतीची किंमत देणे आवश्यक आहे. निर्धारित केल्याप्रमाणे, प्राप्तीच्या कमाल दरापेक्षा अधिक किंवा किमान किंमतीपेक्षा कमी किंमत उद्धृत केलेल्या बोली फेटाळण्यात येतील.

(ज) भारतीय रिझर्व्ह बँकेला, राज्य शासनाशी विचारविनिमय करून, त्याची कोणतीही कारणे न देता, कोणतीही किंवा सर्व बोली संपूर्णपणे किंवा अंशतः फेटाळता येतील.

**दोन. काढलेल्या कर्जरोख्यांची मुक्तपणे विक्री :-**

(क) अधिसूचनेमध्ये मुक्तपणे विक्री केलेल्या कर्जरोख्यांच्या संबंधातील वितरणाची रक्कम दर्शविलेली असू शकते किंवा नसूही शकते.

(ख) भारतीय रिझर्व्ह बँकेने विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास (दिनांकांना) यथोचित व परिपूर्ण भरलेले संबंधित सर्व अर्ज, अधिसूचित केलेली विनिर्दिष्ट ठराविक वेळ संपण्यापूर्वी किंवा बँकेच्या कामकाजाच्या तासामध्ये, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कार्यालयात किंवा या प्रयोजनासाठी अधिसूचित केलेल्या इतर कोणत्याही कार्यालयात सादर करण्यात येतील.

(ग) अशा कर्जरोख्यांची विक्री संपूर्ण वर्षासाठी किंवा वर्षाच्या काही कालावधीसाठी वाढवली जाऊ शकते आणि विक्री कोणत्याही दिवशी, कोणत्याही वेळी किंवा राज्य शासनाशी विचारविनियमय करून भारतीय रिझर्व्ह बँकेने विनिर्दिष्ट केल्यानुसार बंद केली जाऊ शकते.

(घ) भारतीय रिझर्व्ह बँक, राज्य शासनाशी विचारविनियमय करून, त्याची कोणतीही कारणे न देता, कोणतीही किंवा सर्व बोली, एकतर पूर्णपणे किंवा अंशतः नाकारू शकते.

**तीन. विद्यमान असलेल्या कर्जरोख्यांचे रूपांतर करून अंतरण करणे किंवा त्यांचे नव्याने वाटप करणे :-**

(क) भारतीय रिझर्व्ह बँक, राज्य शासनाशी विचारविनिमय करून, विद्यमान कर्जरोखेधारकांना, विनिर्दिष्ट किंमतीला किंवा लिलावात निर्धारित केलेल्या किंमतीला विवक्षित विद्यमान कर्जरोख्यांचे इतर रोख्यांमध्ये रूपांतर करण्याचा पर्याय देऊ शकते.

(ख) भारतीय रिझर्व्ह बँकेला, त्याची कोणतीही कारणे न देता, संपूर्णतः किंवा अंशतः सर्व लिलाव स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार असेल.

**चार. भारतीय रिझर्व्ह बँकेशी विचारविनिमय करून, राज्य शासनाद्वारे, अधिसूचित केली जाणारी इतर कोणतीही पद्धत.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास चंद्र रस्तोगी,**
अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा),
महाराष्ट्र शासन, वित्त विभाग.

**FINANCE DEPARTMENT**

Madame Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 10th July, 2026.

*NOTIFICATION*

No. LNF-2026/CR-54/W & M

**Sale and Issuance of State Government Securities**

Government of Maharashtra, in supersession of it's Notification No. LNF-10.19/CR-10/W & M, dated May 16, 2019 hereby, notifies the terms and conditions for sale and issuance of Government Securities issued by the Government of Maharashtra, (hereinafter referred to as "Securities").

**2. Name and Applicability :-**

(i) This Notification shall be called as the 'General Notification for Sale and Issuance of Government Securities by the Government of Maharashtra (hereinafter referred to as 'General Notification').

(ii) Sale and issuance of Securities shall be subject to the general terms and conditions contained in this Notification and any other notification that may be issued with respect to creation and issuance of any specific Security (hereinafter referred to as "Specific Notification").

**3. Objective :-**

The objective of this Notification is to list out the terms and conditions applicable to issuance of Securities and certain features and methods of issue of different types of Securities.

The Securities will be issued upon the security of the Consolidated Fund of the State of Maharashtra in accordance with Article 293(1) of the Constitution of India.

**4. Types of Securities :-**

The Government of Maharashtra may issue, from time to time, the following types of Securities:

**i. Fixed Coupon Rate Securities :-**

(a) Securities carry a specific coupon rate, applied to the face value, determined at auction or otherwise, as specified in relevant Specific Notification, and remain fixed during the tenor of the Securities.

(b) Securities may be issued at a discount, at par or at a premium to the face value.

(c) Securities may be issued with original maturity of not less than one year.

(d) Securities may be redeemed at face value or as specified in the Specific Notification.

**ii. Securities with other features as notified in the relevant Specific Notification.**

**5. General Terms and Conditions :-**

The general terms and conditions applicable to sale and issuance of all Securities will be as under:

**i. Eligible Investors :-**

(a) Any person resident in India, including but not limited to firms, companies, corporate bodies, institutions, other State Governments, Union Territories with legislature, provident funds, pension funds, trusts, Hindu Undivided Family and individuals.

(b) Any person resident outside India permitted to invest in Securities in terms of the Foreign Exchange Management (Debt Instruments) Regulations, 2019 issued under Foreign Exchange Management Act, 1999.

**ii. Procedure of Sale and Issue of Securities :-**

The operational procedure and other details such as date and place of issuance, tenor, issuance method, etc., for sale and issue of securities, shall be announced by the Reserve Bank of India (the Reserve Bank) through a press release or such other means as may be considered necessary.

**iii. Form :-**

Securities shall be issued to the investors by credit to their Subsidiary General Ledger (SGL) account or to Constituents Subsidiary Ledger (CSGL) account, maintained with the Reserve Bank or in such other form as may be permitted under the provisions of the Government Securities Act, 2006.

A subsidiary General Ledger (SGL) Account shall mean an account opened and held with the Reserve Bank for holding or/and transacting in Government Securities.

CSGL is the SGL account opened and maintained with the Reserve Bank by an agent on behalf of the constituent of such agent.

**iv. Minimum Subscription :-**

Securities will be issued for a minimum amount of ₹ 10,000 (Face Value) and in multiples of 10,000/- thereafter, or any other amount as specified by the Reserve Bank of India (RBI), in consultation with the State Government.

**v. Payment :-**

Payment shall be made by the successful SGL/CSGL account holders on such dates as mentioned in the Specific Notification or as specified by the Reserve Bank, by means of an authority to debit their current account with the Reserve Bank or by Electronic Fund Transfer or any other means as stipulated by the Reserve Bank.

**vi. Coupon :-**

(a) Coupon on Securities will be paid by the Public Debt Offices (PDOs) of the Reserve Bank.

Coupon on Securities held in Bond Ledger Account with any of the offices of the Reserve Bank/Agency, as specified by the Reserve Bank in this behalf, will be paid at such Office/Agency.

(b) Coupon will be paid after rounding off the amount to the nearest whole rupee. For this purpose, amount of coupon less than fifty paise will be ignored and fifty paise or more will be rounded off to the next rupee, unless specified otherwise.

**vii. Repayment :-**

(a) Securities will be repaid at PDO of the Reserve Bank or at any other institution at which they are registered at the time of repayment.

(b) Securities will be repaid on the date of redemption as specified in the Specific Notification or before their specified redemption dates in case of exercise of option by the State Government/ option holder in Securities with embedded options, as the case may be.

(c) Securities may be bought back before their specified redemption date, at a price determined through a buyback auction, on any date determined by the Reserve Bank, in consultation with the State Government.

**viii. Transferability :-**

(a) Securities can be renewed, sub-divided, consolidated, converted or transferred in accordance with the provisions of the Government Securities Act, 2006 and the Government Securities Regulations, 2007 framed thereunder and the terms of this notification and any other notification which may be issued in this regard.

(b) The conversion of security from one form to another will be subject to the conditions as per the Specific Notification.

(c) The transfer of Securities by person resident outside India shall be subject to Regulations framed under the Foreign Exchange Management Act, 1999 and the Directions issued thereunder.

**ix. Applicable Laws :-**

(a) The rights of all persons subscribing to or holding the Securities shall be determined in accordance with the Government Securities Act, 2006 and the Government Securities Regulations, 2007 framed thereunder, read with the terms of this Notification and any other Notification as may be issued from time to time.

(b) The provisions of the tax laws, for the time being in force in India, will be applicable for the purpose of assessing and determining the tax liability of the investor or holder of the Securities.

(c) Any dispute in relation to the Securities shall be subject to the jurisdiction of the Courts in India.

**6. Modes of issue of Securities :-**

Government of Maharashtra may issue Securities through following modes:

**i. Issue of Securities through auction :-**

(a) Securities will be issued through auction, either on yield basis or price basis. Where the issue of the Securities paying periodic coupon is on yield basis, the coupon is decided in an auction conducted by the Reserve Bank in the manner as provided hereinafter or as stated in the Specific Notification. Where the issue of the Securities paying periodic coupon is on price basis, the coupon will be pre-determined.

(b) Both competitive and non-competitive bids for the auction should be submitted in electronic format on the Reserve Bank's Core Banking Solution or any other platform/ system as decided by the Reserve Bank. The Reserve Bank may permit submission of physical bids under exceptional circumstances.

(c) Competitive bidder may submit multiple bids at same/different rates of yield or prices, as the case may be. The aggregate amount of bids submitted by an applicant in an auction should not exceed the notified amount.

(d) On the basis of the bids received, the Reserve Bank will determine the maximum rate of yield or the minimum price, as the case may be, at which bids for purchase of Securities will be accepted in the auction. Maximum rate of yield determined in a yield-based auction for the Securities paying periodic coupon will be the per annum coupon rate for those Securities.

(e) Retail Investors can participate in an auction on 'non-competitive' basis as per the extant Scheme of Non-competitive Bidding Facility announced by the Reserve Bank.

(f) The Reserve Bank, in consultation with the State Government, may retain additional subscription up to an amount as may be specified in the 'Specific Notification'.

(g) The auction for issue of Securities (yield basis or price basis) can be held as per 'Uniform price' method or 'Multiple price' method or any other method as decided by the Reserve Bank, in consultation with State Government from time to time.

(A) Where an auction is held as per 'Uniform price' method, competitive bids with rates up to and including the maximum rate of yield or the prices up to and including the minimum bid price, as determined by the Reserve Bank, will be accepted at the maximum rate of yield or minimum bid price. Bids quoted higher than the maximum rate of yield or lower than the minimum price, so determined, will be rejected.

(B) Where an auction is held on 'Multiple price' method, competitive bids up to the maximum rate of yield or the minimum bid price, as determined by the Reserve Bank will be accepted at the respective bid rate. In yield-based auction, successful bidders, whose quotes are lower than the maximum rate of yield accepted, are required to pay the price differential. Bids quoted higher than the maximum rate of yield or lower than the minimum price, so determined, will be rejected.

(h) The Reserve Bank, in consultation with State Government, may reject any or all bids either wholly or partially, without assigning any reason thereof.

**ii. Issue of Securities through On-tap sale :-**

(a) The amount of issuance may be/may not be indicated in the notification in respect of the Securities sold on tap.

(b) Applications, duly filled in and complete in all respect, should be submitted to the office of the Reserve Bank or any other office notified for the purpose, before the close of specified time/ banking hours notified by the Reserve Bank on the specified date(s).

(c) Sale of such Securities may be extended to whole, or part of the year and the sale may be closed at any time on any day or as specified by the Reserve Bank, in consultation with the State Government.

(d) The Reserve Bank, in consultation with the State Government, may reject any or all bids either wholly or partially, without assigning any reason thereof.

**iii. Switching/ Issue of new Securities in conversion of existing Securities :-**

(a) The Reserve Bank, in consultation with the State Government, may provide the holders of Securities an option to convert certain existing Securities into other Securities at specified price or at a price as determined in auction.

(b) The Reserve Bank may accept or reject any or all bids either wholly or partially, without assigning any reason thereof.

**iv. Any other mode, as may be notified by the State Government, in consultation with the Reserve Bank.**

By order and in the name of Governor of Maharashtra,

VIKAS CHANDRA RASTOGI,
Addl. Chief Secretary (Financial Reforms)
to the Government of Maharashtra
Finance Department.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.